**निशाणी क्र. ३९ लगत**

**<u>प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास वादीतर्फे विधिज्ञा श्रीमती पी. बी. टाकळे यांच्यामार्फत शपथेवर सुरू</u>**

९. माझे शिक्षण बी.ए. झाले आहे. माझ्या आजोबांना एकूण ७६ आर इतकी जमीन आहे. सदर जमिनीच्या पूर्वेस भाऊसाहेब देशपांडे यांची जमीन आहे, पश्चिमेस काशिनाथ चिंतले यांची जमीन आहे, दक्षिणेस भाऊसाहेब देशपांडे यांची जमीन आहे व उत्तरेस अनिता होनराव यांची जमीन आहे. माझे आजोबा मयत झाले आहेत. वादी हे माझे चुलते असून ते वयाने सर्वात मोठे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, ७६ आर या क्षेत्रात बालाजीचे मंदिर आहे. दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी वादी, प्रतिवादी क्र.१ व बाबुराव गोविंद चिंतले यांची नावे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही वादीच्या मालकी वहिवाटीची आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे आजोबा गोविंदराव हे बालाजी मंदिराचे पुजारी होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे आजोबा त्या मंदिरात पुजा करीत असल्याने लोकांनी त्यांना दावा मिळकत दान केलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही वडिलोपार्जित मिळकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे आजोबा मयत झाल्यानंतर कुटुंबाचा कारभार वादीकडे आला. हे म्हणणे खरे आहे की, आजोबा मयत झाल्यानंतर दावा मिळकतीची पाहणी वादी करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांचा सांभाळ वादीने केला.

१०. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीत हरकत, अडथळा करीत असल्याबाबत वादीने माझ्याविरूद्ध न्यायालयात तक्रार दाखल केली आहे. त्या प्रकरणात मी हजर झालो आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत वादीच्या एकट्याच्या मालकी व वहिवाटीची आहे. वाटण्या झाल्याबाबत मी कागदोपत्री पुरावा दाखल करू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे ७/१२ तयार केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत माझा कोणताही हक्क नाही. हे म्हणणे खरे नाही

की, खोटे शपथपत्र दाखल करून आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती

Digitally signed by KRISHNADEO ANKUSH YADAV
Date: 2026.03.10 18:56:41 +0530

उदगीर **(के. ए. यादव)**

दिनांक – १०/०३/२०२६ २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, उदगीर